महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९००  फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in  वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:- १४४२(२)(२)/ २०१६/तेरा-अ                                        दिनांक-  १२ एप्रिल, २०१९

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा – २०१६
## (जाहिरात क्र. ५४/२०१६ व अधिसुचना क्र. ४१/२०१७)
## सुधारीत अंतिम निकालाबाबत घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने यापुर्वी दि. २० जून, २०१८ रोजी विषयांकित परीक्षेच्या ७५० जागांचा निकाल जाहिर केला होता. तथापि, समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल झालेल्या मूळ अर्ज क्र. ६९४/२०१८ व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. ९२/२०१९ मधील न्यायिक आदेश तसेच क्रीडाविषयक पडताळणी अहवालासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल झालेल्या मूळ अर्ज क्र. ६३५/२०१८ व तत्सम अन्य प्रकरणातील मा. न्यायाधिकरणाचे आदेश विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २५ जून, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१६ चा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अधीन राहून दिनांक १२ एप्रिल, २०१९ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. प्रशासकीय कारणास्तव अराखीव (खेळाडू) वर्गवारीचे एक पद रिक्त ठेवण्यात आले असुन सदर पदाच्या ७४९ जागांचा सुधारित निकाल जाहिर करण्यात आला आहे.

३. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. उच्च न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर  करण्यात आला आहे.

४. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त/शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे.  अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.  (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील “उमेदवारांना सर्वसाधारण सूचना” मधील सूचना क्रमांक ३.८ पहावे)

ठिकाण - मुंबई

उप सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग